फिर्यादी जबाब

चिपळूण
दिनांक ०३/११/२०२२

मी ॲड. मनोज शांताराम मोरे, वय-३६ वर्षे, व्यवसाय- वकिली, रा. आंबडस ता. खेड, जि. रत्नागिरी, मो. नं. ९६०४०३३४१३ समक्ष फिर्याद लिहून देतो की,

मी माझे कुटुंबासह वरील नमुद पत्त्यावर रहात आहे. दिनांक ०१/११/२०२२ रोजी मी श्री. कांबळे, पोलीस निरीक्षक, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी यांना फोनद्वारे माझ्याकडे दुय्यम निबंधक श्री. धोत्रे लाच रक्कम मागत असलेबाबतची तक्रार कळविली होती. त्यानुसार दिनांक ०२/११/२०२२ रोजी पोलीस निरीक्षक श्री. कांबळे, दोन शासकिय पंच व ॲसीबी स्टाफ यांनी माझे तक्रारीचे अनुषंगाने वर्धमान महावीर मंदिर कामथे चिपळुण जवळ माझी भेट घेतली. त्यांना मी माझी तक्रारीची हकीकत तोंडी सांगुन स्व:हस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली त्यातील मजकुर पुढीलप्रमाणे-" मी वरील नमुद पत्त्यावर राहत असुन व्यवसायाने वकील आहे. माझे मौजे चिपळुण येथे कार्यालय असुन पक्षकारांचे साठेखत, खरेदीखत, दस्त नोंदणी व इतर कामे करीत असतो. श्री. कुशल दत्ताराम महाडीक यांचे सद्गुरु व्हेंचर या फर्म मार्फत गुरु संकल्प या इमारतीमधील विक्री करण्यात येणाऱ्या सदनिकांचे खरेदीखत नोंदणीचे काम माझेकडे देण्यात आलेले असुन त्याबाबत माझ्या ऑफीसमधील कर्मचारी श्री. पांडुरंग दिलीप मोडक यांचे नावे मुखत्यारपत्र दिलेले आहे.परंतु त्याबाबतचे सर्व व्यवहार व कामे मी स्वत: करीत असतो. श्री. अभिजीत वसंत निंबाळकर यांनी सद्गुरु व्हेंचर यांचे गुरु संकल्प या इमारतीमध्ये सदनिका खरेदी केलेली आहे. त्याबाबतचे साठेखत नोंदणी करण्यात आलेले असुन त्याचे खरेदीखत नोंदणी करुन त्याच्या प्रती देणेसाठी तसेच दुसरे पक्षकार श्री. शादाब शरीफ फजलानी यांचे हक्कसोडपत्र नोंदणी करणेसाठी मी दिनांक २८/१०/२०२२ रोजी दुय्यम निबंधक चिपळुण श्री. धोत्रे यांची भेट घेतली असता त्यांनी सदरचे खरेदीखत व हक्कसोडपत्र नोंदणी करणेसाठी तसेच मी यापुर्वी नोंदविलेल्या दस्ताचा मोबदला म्हणुन असे एकुण १०,०००/- रुपये रक्कमेची मागणी केलेली आहे. वर नमुद केलेल्या सर्व कामांची शासकीय फी मी ऑनलाईन भरलेली आहे. त्यामुळे श्री. धोत्रे हे मागत असलेली रक्कम लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाल्याने व मला लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक ०१/११/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय रत्नागिरी येथील पोलीस निरीक्षक श्री. कांबळे यांचे मोबाईलवर कॉल करुन तक्रार केली होती. त्यानुसार आज रोजी पोलीस निरीक्षक श्री. कांबळे यांची मी समक्ष भेट घेवुन माझी लेखी तक्रार देत आहे. दुय्यम निबंधक श्री. धोत्रे यांचेशी माझा कोणताही आर्थिक व्यवहार प्रलंबित नाही. सोबत श्री. कुशल दत्ताराम महाडीक, श्री. अभिजित वसंत निंबाळकर व शादाब शरीफ फजलानी यांनी दिलेले अधिकारपत्र जोडले आहे. वगैरे मजकुराचा अर्ज सादर केला. सदर तक्रारी अर्जावर पंचानी व पोलीस निरीक्षक श्री. कांबळे यांनी सहया केल्या.सदरचा तक्रारी अर्ज पोलीस निरीक्षक श्री. कांबळे यांनी त्यांच्या ताब्यात घेतला.

त्यानंतर मी केलेल्या अर्जाची पडताळणी दुय्यम निबंधक चिपळुण श्री. धोत्रे यांना समक्ष भेटुन करण्यात येणार असल्याचे सांगून, सदर भेटी दरम्यान माझेत व दुय्यम निबंधक श्री. धोत्रे यांचेतील संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक श्री. कांबळे यांनी पंचाना व मला सांगितले. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांनी शासकीय वाहनामध्ये स्वत:चे, माझे व पंचांचे पडताळणीसाठी जात असल्याचे निवेदन डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले.

पोलीस निरीक्षक श्री. कांबळे यांनी मला व पंच नं. १ मोहिते यांना दुय्यम निबंधक श्री. धोत्रे यांची भेट झाल्यांनतर वर्धमान महावीर मंदिर कामथे चिपळुण जवळ येथे परत येण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर त्यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या शर्टच्या आतील बाजुस बनियनमध्ये लपविला. मी व पंच नं. १ मोहिते असे आम्ही दोघे मोटारसायकलने दुय्यम निबंधक श्रेणी १ कार्यालय चिपळूण येथे गेलो. मी मोटारसायकलवरुन उतरुन दुय्यम निबंधक श्रेणी-१, कार्यालयात गेलो. माझे मागोमाग पंच क्र.१ मोहीते देखील दुय्यम निबंधक कार्यालयात आले. त्यावेळी मी कार्यालयात जावुन दुय्यम निबंधक धोत्रे यांचे सोबत कामासंबंधी बोलत होतो. त्यावेळी पंच क्र. १ मोहीते माझे जवळच थांबुन होते. त्यावेळी मी दुय्यम निबंधक धोत्रे यांना आत्ता ॲक्चुअली काय... कसा काय आपला दर.. आता हक्क सोडपत्राचा असे विचारले त्यावर

समक्ष
(अनंत कांबळे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

M.S.More
(मनोज शांताराम मोरे)

Scanned with OKEN Scanner

दुय्यम निबंधक धोत्रे हे पडवेकर आले ना ते आल्यावर सांगतील असे बोलले त्यावर मी पडवेकर वाढवुन सांगतील तुम्ही मला अँक्चॅक्ट काय दयायचे ते बोला असे बोललो त्यावेळी दुय्यम निबंधक धोत्रे यांनी त्यांचे टेबलवरील कॅलक्युलेटर घेवुन कॅलक्युलेटरवर २००० असे टाईप करुन दाखवत नाय तस नाय मी तुम्हाला बोललेलो आहे अँडजेस्ट करतो असे बोलले त्यावेळी मी आता तुम्ही आज रिलिज डेट केली त्याचे कितीने हजार प्रमाणे देवु की, दोन हजार रुपये प्रमाणे असे विचारले त्यावर दुय्यम निबंधक धोत्रे यांनी तुच मला सांग मी अँडजेस्ट केल ना तिथं असे सांगितले त्यावेळी मी आता तुम्हाला हजार रुपये प्रमाणे देवु का दोन हजार प्रमाणे देवु असे विचारले त्यावर दुय्यम निबंधक धोत्रे यांनी त्या दोन कामांचे वेगळे बाकीच्याचे वेगळे देणार. दोन दोन हजार प्रमाणे त्या दोन कामांचे दे असे सांगितले त्यावेळी मी दोन दोन हजार प्रमाणे असे बोलुन आता आपण खरेदीखत केल ना. कृशल खरांच कृशल महाडीक साठेखत वगैरे पकडुन त्याचे किती देवु असे विचारले त्यावेळी दुय्यम निबंधक धोत्रे यांनी साठेखत वगैरे असेल ना त्याच्यामधे असे बोलुन कॅलक्युलेटरवर ५०० टाईप केले त्यावेळी मी कॅलक्युलेटर कडे बघुन पाचशे रुपये असे विचारले त्यावर दुय्यम निबंधक धोत्रे यांनी हा ...आणि लँडच वगैरे असेल ना. त्याचे एक हजार असे सांगितले. त्यावर आता मी तुम्हाला साडेचार हजार मी देणे... दोन साठी दोन चार .... आणि पाचशे असे बोलुन मागच्या व्यवहाराचे असे विचारले त्यावेळी दुय्यम निबंधक धोत्रे यांनी आता यांना ना ... थोड थोड तरी दे.. असे बोलले तेव्हा हा ते मी देईन ते माझं राहील.. तुम्ही नको .. पुढे पुढे काम आहे ना. एक सांगा की मागचे काय दयायचे आहेत कस काय ....असे बोलले तेव्हा दुय्यम निबंधक धोत्रे तुझी इच्छा हे बघ मी काम दिलं तुला तुझी काय इच्छा असेल तर... असे बोलले त्यावर मी सांगा तुम्ही मग मी तसं एक लमसम अमाऊंट देवुन जाईन म्हणजे ह्याच्या पुढे व्यवस्थित विषय चालु राहील.... असे बोललो त्यावर दुय्यम निबंधक धोत्रे यांनी तेच म्हणतोय बाळा... की तुझ्या इच्छेप्रमाणे दे एक राऊंड फिगर काय ते... असे बोलले त्यावर मी देतो राऊंड फिगर मध्ये करुन देतो लंचच्या नंतर .. असे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र. १ मोहीते कार्यालयातुन बाहेर आलो व पडताळणी पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो.

त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांनी माझे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला. मी व पंच क्र. १ मोहीते यांनी घडलेली हकिकत पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांना सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांनी शासकीय वाहनात डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यातील संभाषण मला व पंचाना ऐकविले.

दुय्यम निबंधक धोत्रे यांनी माझेकडे माझे पक्षकार अभिजीत निंबाळकर यांचे खरेदीखत नोंदणी करुन खरेदीखताची प्रत देण्याकरीता पाचशे रुपये व पक्षकार शादाब शरीफ फजलानी यांचे वडीलोपार्जित दोन गाळे व सदनिका या मधुन त्यांच्या बहीणींची नावे कमी करण्यासाठी दोन वेगवेगळे हक्कसोड पत्र नोंदणी करुन त्याची प्रत देण्यासाठी प्रत्येकी दोन हजार रुपये प्रमाणे एकुण चार हजार रुपये असे साडेचार हजार रुपये तसेच मी यापुर्वी दाखल केलेल्या दस्तांच्या कामाचा मोबदला म्हणुन इच्छेप्रमाणे राऊंड फिगर करुन दया असे बोलुन लाच रक्कमेची मागणी केल्याचे व मागणी केलेली लाच रक्कम लंच नंतर स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणीमध्ये आढळुन आले आहे. तसेच दुय्यम निबंधक धोत्रे यांनी लाच रक्कम लंच नंतर स्विकारणार असल्याचे मान्य केल्याने सापळा कारवाई लंच नंतर करणार असल्याचे व पडताळणी वेळेची स्क्रिप्ट नंतर बनविणार असल्याचे पोनि कांबळे यांनी मला व पंचाना सांगितले.

दुय्यम निबंधक धोत्रे यांनी काय ते राऊंड फिगर करुन दया असे मला सांगितल्याने ते पुर्वीच्या कामाचे धरुन ७,०००/-रुपये लाच रक्कम स्विकारतील असे मी पोनि कांबळे, पंच व सापळा पथकास सांगितले. त्याप्रमाणे पोनि कांबळे यांच्या सुचनेवरुन मी लाचेची रक्कम रुपये ७,०००/-(सात हजार रुपये)(त्यामध्ये रु. ५००/-दराच्या १४ भारतीय चलनी नोटा) हजर केली. पोनि कांबळे यांच्या सुचनेवरुन माझी पंच नं. १ मोहिते यांनी अंगझडती घेतली. अंगझडतीत मिळुन आलेल्या चीजवस्तु व रोख रक्कम मला परत केली.

कामथे येथील वर्धमान महावीर मंदीरा जवळ शासकिय वाहनात पोनि कांबळे यांनी मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट दिवा व अँन्थ्रासीन पावडर दाखवून त्याचे उपयोग व गुणधर्म समजावून सांगितले. अँन्थ्रासीन पावडर लावलेल्या वस्तूवर अंधारामध्ये अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता, त्या वस्तूवर अँन्थ्रासीन

समक्ष

(अनंत कांबळे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

M.S.More
(मनोज शांताराम मोरे)

Scanned with OKEN Scanner

पावडरची फिक्कट निळसर हिरवट चकाकी दिसून येते. नेहमीच्या प्रकाशात तशी चकाकी दिसून येत नाही असा गुणधर्म असल्याचे सांगितले. मी हजर केलेली लाचेची रक्कम प्रथम नेहमीच्या उजेडात व नंतर शासकिय वाहनात काळया कपडयाच्या सहाय्याने कृत्रिम अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात दाखविले त्या नोटा नेहमी सारख्याच दिसल्या.

पोनि कांबळे यांच्या सूचनेवरून पोहवा कोळेकर यांनी लाचेची रक्कम एका कागदावर ठेवून नोटांच्या दोन्ही बाजूस हाताच्या बोटाने अँन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर त्यांचे हात व नोटा नेहमीच्या प्रकाशात दाखविले. नोटा अगर त्यांच्या दोन्ही हातांच्या बोटांवर अँन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर शासकिय वाहनात काळया कपडयाच्या सहाय्याने कृत्रिम अंधार करून पोहवा कोळेकर यांच्या हातामधील लाच रक्कमेवर पोनि कांबळे यांनी अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या नोटांवर दोन्ही बाजूस अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. तशीच चकाकी पोहवा कोळेकर यांच्या दोन्ही हाताच्या बोटांवर दिसून आली. त्यानंतर पुन्हा उजेड करण्यात आला. पोनि कांबळे यांच्या सूचनेवरून पोहवा कोळेकर यांनी दुय्यम निबंधक धोत्रे यांना देण्यासाठी रू. ७,०००/- नोंटाची घडी करुन माझ्या शर्टचे डावे खिशात ठेवली. त्यावेळी मला पोनि कांबळे यांनी सूचना दिली की, दुय्यम निबंधक धोत्रे हे लाचेच्या रक्कमेची मागणी करेपर्यंत व लाच रक्कम देण्याची वेळ येत नाही तोपर्यंत त्यांनी सदर लाच रक्कमेला हात लावू नये. तसेच दुय्यम निबंधक धोत्रे यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर मी सापळा पथकाला माझा डावा हात डोक्यावरुन फिरवुन दुय्यम निबंधक धोत्रे यांनी लाच रक्कम स्विकारल्याबद्दल इशारा करावा असे सांगितले.

सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्यांनतर पोनि कांबळे यांनी सापळा आयोजित करणार असल्याचे सांगितले. तसेच मी दुय्यम निबंधक धोत्रे यांना लाच रक्कम देण्यासाठी त्यांची भेट घेईन त्यावेळी आमच्यातील होणारे संभाषण डि.व्ही.आर. मधील मेमरीकार्ड वर ध्वनीमुद्रीत करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि कांबळे यांनी स्वत:चे, माझे व पंचाचे निवेदन मेमरीकार्डमध्ये रेकॉर्डिंग केले. सापळा काइवाईच्या अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांना योग्य त्या सुचना देण्यात आल्या.

पोनि श्री कांबळे यांनी डि.व्ही.आर चालु करुन माझ्या शर्टच्या आत बनियनमध्ये लपविला. मी व पंच नं. १ मोहीते असे मोटार सायकलने दुय्यम निबंधक श्रेणी-१ कार्यालय चिपळुण येथे गेलो. मी मोटार सायकल वरुन उतरुन दुय्यम निबंधक कार्यालयात गेलो. त्यावेळी पंच नं. १ मोहीते देखील माझे मागोमाग कार्यालयात आले. त्यावेळी मी व दुय्यम निबंधक धोत्रे यांचेत कामासंबंधात बोलणे चालु होते. दुय्यम निबंधक धोत्रे यांनी खाजगी इसम पडवेकर यांना बोलावले व आयला देतो ते घे बाबा लक्ष्मी... याच्यापुढे करणार आहे तो होतायत की नाय असे सांगितले. त्यावेळी मी फजलानीचे दोन दस्ताचे चार हजार आणि पाचशे ते आणि अगोदरचे किती दयायचे असे विचारले. त्यावेळी दुय्यम निबंधक धोत्रे यांनी सगळं झाल्यावर तुला राऊंड फिगर तुला काय दयायचं ते दे... असे सांगितले त्यावर मी केली आहे राऊंड फिगर असे सांगितले त्यावेळी दुय्यम निबंधक धोत्रे यांनी मग दे ना असुदे ना भाऊ नाय बरोबर.... म्हणजे एक दहा हजार असतील तर दहा देवुन टाका असे सांगुन दे ना... पडवेकरांकडे असे सांगितले त्यावेळी मी माझ्या शर्टच्या डाव्या खिशातील लाच रक्कम माझ्या उजव्या हाताने काढुन दुय्यम निबंधक धोत्रे यांचे समोर धरली व घ्या मोजुन घ्या... असे सांगितले त्यावेळी दुय्यम निबंधक धोत्रे यांनी अरे राहु दे... पडवेकरांकडे दे असे सांगितले. त्यावेळी मी मोजुन घ्या किती आहेत ते बघा मग मला सांगा काय ते... लागल्यास पुढचे आणुन देतो असे सांगितले. त्यानंतर माझेत व दुय्यम निबंधक धोत्रे यांचेत कामासंबधात बोलणे चालु होते. त्या दरम्यान दुय्यम निबंधक धोत्रे यांनी पडवेकर ठेवा ना तुमच्याकडे घ्या ठेवुन घ्या.... मी कमिटमेंट बघीतली असे सांगितले. त्यावेळी खाजगी इसम पडवेकर यांनी माझेकडील लाच रक्कम स्विकारुन किती आहेत असे विचारले. त्यावेळी मी बघा मोजुन घ्या असे असे सांगुन सात हजार दिलेत सात हजार दिलेत असे सांगितले त्यावेळी दुय्यम निबंधक धोत्रे यांनी जे काय आहेत ते घ्या. तीन हजारची नंतर आपण पार्टी करु वाटल्यास मी देईन असे सांगितले. त्यावेळी खाजगी इसम पडवेकर यांनी लाच रक्कम त्यांचे टेबलच्या उजव्या बाजुच्या ड्रॉवर मध्ये ठेवली. त्यानंतर माझेत व लोकसेवक धोत्रे यांच्यात बोलणे चालु होते. काही वेळाने मी कार्यालयाचे बाहेर आलो व सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा म्हणुन माझा

समक्ष
(स्वाक्षरी)
(अनंत कांबळे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

M.S. More
(मनोज शांताराम मोरे)

Scanned with OKEN Scanner

डावा हात माझे डोक्यावरून वारंवार फिरविला त्यानंतर पोनि कांबळे यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो बंद करून तो स्वत:चे ताब्यात ठेवला. त्यानंतर पोनि कांबळे यांनी मला लाच रक्कम कोणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता, दुय्यम निबंधक धोत्रे यांनी लाच रक्कम खाजगी इसम पडवेकर यांचेकडे देण्यास सांगितल्याने मी लाच रक्कम रू. ७,०००/- माझे शर्टचे डावे खिशातुन उजवे हाताने काढून पडवेकर यांचेसमोर धरली असता त्यांनी ती रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून ती लाच रक्कम त्यांचे टेबलच्या उजव्या बाजुच्या ड्रॉवरमध्ये ठेवली असे सांगितले. लागलीच पोनि कांबळे यांनी खाजगी इसम पडवेकर यांना व पोना आंबेकर यांनी दुय्यम निबंधक धोत्रे यांना अटकावुन ठेवले. ती वेळ १५.४० वाजताची होती. त्यानंतर पोनि कांबळे यांनी मला माझे हात कशासही लागणार नाही असे स्थितीत कार्यालयाचे बाहेर जावुन थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी बाहेर जावून थांबलो.

त्यानंतर पोनि कांबळे यांनी मला दुय्यम निबंधक कार्यालय चिपळुण येथील कार्यालयात बोलावुन दारे, खिडक्या व लाईट बंद करून कृत्रिम अंधार करून माझ्या हातांची व शर्टची अल्ट्राव्हॉयोलेट दिव्याखाली तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताच्या अंगठयासह सर्व बोटांचे पेरांना व शर्टचे पुढील डावे बाजुचे खिशाचे वर व आतील बाजुस ॲन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. पंच नं. १ मोहीते यांनी माझी अंगझडती घेतली. त्यामध्ये सापळापुर्व कारवाईचे पुर्वी होत्या तशा वस्तु मिळुन आल्या. पोनि कांबळे यांचे सुचनेवरून मी हात धुतले.

तरी माझे पक्षकार श्री. अभिजित वसंत निंबाळकर यांनी सद्‌गुरु व्हेंचर यांचे गुरु संकल्प या इमारतीमध्ये खरेदी केलेल्या सदनिकेच्या खरेदीखताची नोंदणी करुन खरेदीखताची प्रत देणेसाठी ५००/- रुपये तसेच श्री. शादाब शरीफ फजलानी यांचे वडीलोपार्जीत दोन गाळे व एक सदनिका यामधुन त्यांचे बहीणींची नावे कमी करण्यासाठी दोन वेगवगळी हक्क सोडपत्र नोंदणी करुन त्याची प्रत देणेसाठी ४०००/- रुपये व मी यापुर्वी केलेल्या दस्ताचा मोबदला म्हणुन काय होतील ते राउंड फिगर अशा लाच रक्कमेची श्री. प्रशांत रघुनाथ धोत्रे, दुय्यम निबंधक श्रेणी १, चिपळुण, ता. चिपळुण, जि.रत्नागिरी यांनी दिनांक ०२/१२/२०२२ रोजी १२.५८ ते १३.१८ व १५.१६ ते १५.३४ वाजताचे मुदतीत दुय्यम निबंधक श्रेणी १ कार्यालय चिपळुण ता. चिपळुण, जि. रत्नागिरी येथे माझेकडे तडजोडीअंती लाच रक्कमेची मागणी केली व मागणी केलेली राउंड फिगर होणारी लाच रक्कम ७,०००/- रुपये श्री. प्रशांत रघुनाथ धोत्रे, दुय्यम निबंधक श्रेणी १, चिपळुण यांचे सांगणेवरुन खाजगी इसम श्री. अरविंद बबन पडवेकर यांनी दिनांक ०२/११/२०२२ रोजी १५.१६ ते १५.३४ वाजताचे सुमारास दुय्यम निबंधक श्रेणी १ कार्यालय चिपळुण ता. चिपळुण, जि. रत्नागिरी येथे स्वीकारल्यानंतर त्यांना पंचासमक्ष रंगेहात पकडले म्हणुन माझी त्यांचे विरुध्द तक्रार आहे.

माझा फिर्यादी जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मला वाचून दाखविला व समजावुन सांगितला तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

(अनंत कांबळे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

हे लिहुन दिले

M.S.More
(मनोज शांताराम मोरे)

Scanned with OKEN Scanner